बृहन्मुंबई महानगरपालिका

घन कचरा व्यवस्थापन खाते, आर/मध्य विभाग

सहा.अभि/आर-मध्य/५५००/घ.क.व्य. दि.२०.११.२०२६

स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात

विषय :- आर/मध्य विभाग कार्यालय इमारत येथील दैनंदिन स्वच्छतेसाठी हाऊस किपींग संस्थेची नेमणुक करणे बाबत.

आर/मध्य विभाग कार्यालय इमारत येथील दैनंदिन स्वच्छतेसाठी ५ महिन्यांच्या कालावधीसाठी हाऊसकिपिंग कामातील अनुभवी आर/मध्य विभागाच्या हद्दीमधील नोंदणीकृत अशासकीय संस्थेची अथवा आर/मध्य विभागाच्या हद्दीमधील नोंदणीकृत कंपनीची नेमणुक करणेसाठी भविष्य निर्वाह निधी व राज्य कर्मचारी विमा योजनेमध्ये नोंदणीकृत असणा-या अशासकिय संस्था अथवा खाजगी कंपनी इ. संस्थाकडून त्यांची पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

अर्जाचा नमुना आर/मध्य विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु.३,९९३/- अधिक १८ टक्के (वस्तू व सेवा कर) रोख स्वरुपात भरल्यानंतर दि.२०.११.२०२६ ते दि.२७.११.२०२६ पर्यंत सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० या वेळेत विकत मिळू शकेल. सदर कामासाठी अनामत रक्कम रु.४५,०००/- दि.२७.११.२०२६ दु.०१.०० पर्यंत स्विकारली जाईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्था / कंपनीला कामाचे वाटप आर/मध्य विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर/मध्य विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी. आर/मध्य विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. २७.११.२०२६ (दुपारी ०३.०० वाजेपर्यंत).

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत. सदर जाहीरातीच्या अनुषंगाने अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकारी सहाय्यक आयुक्त, आर/मध्य यांना असतील व ते अर्ज करणा-या संस्थेस बंधनकारक असतील.

सही/-
सहाय्यक अभियंता (घकव्य)
आर/मध्य विभाग